# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०—२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०—२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ—मेल :dyracademic@unipune.ac.in

संदर्भ क्र.: CA/ 173 दिनांक : 09/02/2018

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये

**विषयः—** शैक्षणिक वर्ष २०१७—१८ मध्ये विशिष्ट विद्याशाखांच्या जलदगती कार्यपध्दतीने नवीन अतिरिक्त तुकडयांना दिलेल्या मान्यतेबाबत.

**संदर्भः—** १) मा. शिक्षण संचालक यांचे क्र. अशाम—२०१७/नवीन महा.विषय/तुकडया/मवि—२/११५८, दि. २५.०१.२०१८
२) मा. सहसंचालक यांचे पत्र क्र. ससं/उशि/पुवि/२०१७—१८/जलदगती अति. तु/२०१८/१८३, दि. २५.०१.२०१८

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७—१८ या एका वर्षाकरीता जलदगती कार्यपध्दतीने अतिरिक्त तुकडया ज्या महाविद्यालयांना मान्य करण्यात आलेल्या आहेत अशा महाविद्यालयांनी सोबत जोडलेल्या वरील संदर्भीय पत्र क्र. १ व २ नुसार कार्यवाही करावी.

कळावे,

आपला

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

सोबतः— वरीलप्रमाणे.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**
Web : www.dhepune.gov.in- E-Mail :mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्र.अशाम-२०१७/नवीन महा.विषय/तुकडया/मवि-२ /1158 दि.२५/०१/२०१८

ACADEMIC SECTION
Savitribai Phule Pune University
25 JAN 2018
Date 07 FEB 2018
Inward No. 1388

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

**विषय- सन २०१७-१८ मध्ये जलदगती अतिरिक्त तुकडयांना दिलेल्या मान्यतेबाबत.**

**संदर्भ- शासनपत्र क्र.एनजीसी-२०१७/(२१८/१७)/मशि-४, दि.२३/०१/२०१८**

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्र कृपया पहावे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ (८) मध्ये असामान्य परिस्थितीत विशिष्ट विद्याशाखांच्या अतिरिक्त नवीन तुकडयांना जलदगती पध्दतीने मान्यता देण्यासंदर्भातील तरतुदीस अनुसरुन शासन निर्णय दि.०४/०७/२०१७ अन्वये निकष व कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन विद्यापीठांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते व शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या जलदगती तुकडयांना शासन निर्णय दि.३१/०८/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर जलदगती तुकडया मंजूर करताना शासन निर्णय दि.०४/०७/२०१७ मधील निकषांची पूर्तता करणे क्रमप्राप्त करयात आले आहे सदर तुकडीत प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता शासनाने नियमित तुकडीकरिता विहित केलेल्या निकषांप्रमाणे भौतिक साधने व अध्यापक वर्ग उपलब्ध आहे किंवा त्यासाठी तात्पुरती व्यवस्था करण्यात आलेली आहे. यासंदर्भातील तपशिलवार प्रमाणपत्र महाविद्यालयाने अर्जासोबत जोडणे आवश्यक असून विद्यापीठाने ही बाब प्रमाणित करावी. ज्या महाविद्यालियांनी तात्पुरत्या स्वरुपात व्यवस्था केलेली आहे, त्या महाविद्यालयांनी पुढील ६ महिन्यात शासनाने नियमित तुकडीकरिता विहित केलेल्या निकषांची पुर्तता करण्यात येईल, असे हमीपत्र जोडणे आवश्यक राहील, तसेच पुढील ६ महिन्यात या निकषांची पुर्तता करण्यात आल्यानंतर पुर्ततेचे प्रमाणपत्र विद्यापीठांमार्फत (निकष पूर्ण केल्याचे विद्यापीठाने प्रमाणित करुन) शासनाकडे सादर करणे आवश्यक राहील.

जलदगती पध्दतीने मान्यता दिलेल्या अतिरिक्त तुकडी नैसर्गिक वाढीने पुढे चालू राहील. मात्र अशा तुकडीस पुढील शैक्षणिक वर्षामध्ये नियमित शासन मान्यता प्राप्त न झाल्यास सदर तुकडीमध्ये प्रथम वर्षाकरिता विद्यार्थी प्रवेशित करता येणार नाही. पुढील शैक्षणिक वर्षाकरिता अशा नियमित तुकडीकरिता शासनाने विहित

केलेल्या निकष व कार्यपध्दतीनुसार नव्याने अर्ज सादर करुन शासनमान्यता घेणे आवश्यक राहील, असे नमुद करण्यात आले आहे.

शासन निर्णय दि.३१/०८/२०१७ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेल्या अतिरिक्त जलदगती तुकडयांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता नियमितपणे व अंमलबजावणीत असणाऱ्या कार्यपध्दतीनुसार मान्यता घेणे क्रमप्राप्त आहे. शासन निर्णयातील तरतुदीनुसार ज्या महाविद्यालयांनी त्यांना मंजूर केलेल्या अतिरिक्त जलदगती तुकडयांकरिता शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी संबंधित विद्यापीठाकडे अर्ज सादर केलेला नाही, अशा अतिरिक्त तुकडया शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता प्रथम वर्षापासून सुरु ठेवता येणार नाही, असे शासनाने संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे.

तरी याबाबत उचित कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत-

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांना आवश्यक कार्यवाहीसाठी.
२. मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग,पुणे १**
Web:www.jdhepune.info E_mail - jdhepune@gmail.com
फोन नं.020-26127833/26051632 फॅक्स नं. 020-26051632

क्र.ससं/उशि/पुवि/२०१७-१८/जलदगती अति.तु./२०१८/ 183 दि.२५/०१/२०१८

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक /क्र. 603
दिनांक - 1/2/2018
5/2/18
Academic

प्रति,
कुलसचिव,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठे,
गणेशखिंड,
**पुणे-४११००७.**

विषय:- सन २०१७-१८ मध्ये जलदगती अतिरिक्त तुकडयांना दिलेल्या मान्यतेबाबत...

संदर्भ:- १) शासन निर्णय, क्र.एनजीसी-२०१७/(१२८/१७)/मशि-४, दि.४/७/२०१७.
२) शासन निर्णय, क्र.एनजीसी-२०१७/(१२८/१७)/मशि-४, दि.३१/८/२०१७ चे आदेश.
३) मा.संचालनालयाकडील क्र.अशाम-२०१७/नविन महा./विषय/ तुकडया/मवि-२/ ११३८, दि.२५/०२/२०१८.

ACADEMIC SECTION
Savitribai Phule Pune University
Date 05 FEB 2018
Inward No. 1424

उपरोक्त विषयाचे संदर्भीये शासन निर्णय/आदेश व मा.संचालनालयाकडील पत्र कृपया पहावेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (८) मध्ये असमान्य परिस्थितीत विशिष्ट विद्याशाखांच्या अतिरिक्त नविन तुकडयांना जलदगती पध्दतीने मान्यता देण्यासंदर्भात संदर्भीय निर्णयानुसार कार्यपध्दती विहीत करुन शासन आदेश दि.३१/८/२०१७ अन्वये निर्गत केले आहेत.

जलदगती तुकडया मंजूर करताना दि.०४/०७/२०१७ मधील निकषांची पुर्तता करणे क्रमप्राप्त करण्यात आलेले आहे. त्यामध्ये ज्या विद्याशाखेच्या जलदगती अतिरिक्त तुकडीकरीता मागणी करण्य्यात आलेली आहे, त्या तुकडीत प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता शासनाने नियमित तुकडीकरीता विहीत केलेल्या निकषांप्रमाणे भौतिक साधने व अध्यापक वर्ग उपलब्ध आहे किंवा त्यासाठी तात्पुरती व्यवस्था करण्यात आलेली आहे, या संदर्भातील तपशिलवार प्रमाणपत्र महाविद्यालयांना अर्जासोबत जोडणे आवश्यक असून, विद्यापीठांनी ही बाब प्रमाणित करावी. ज्या महाविद्यालयांनी तात्पुरत्या स्वरुपात व्यवस्था

केलेली आहे, त्या महाविद्यालयांनी पुढील सहा महिन्यांत शासनाने नियमित तुकडीकरीता विहीत केलेल्या निकषांची पूर्तता करण्यात येईल, असे हमीपत्र जोडणे आवश्यक राहील.

तसेच पुढील सहा महिन्यांत या निकषाची पूर्तता करण्यात आल्यानंतर पूर्ततेचे प्रमाणपत्र विद्यापीठामार्फत (निकष पुर्ण केल्याचे विद्यापीठाने प्रमाणित करुन) शासनाकडे सादर करणे आवश्यक राहील.

याप्रमाणे जलदगती पध्दतीने मान्यता दिलेली अतिरिक्त तुकडी नैसर्गिक वाढीने पुढे चालू राहील. **मात्र, अशा तुकडीस पुढील शैक्षणिक वर्षात नियमित शासन मान्यता प्राप्त न झाल्यास सदर तुकडीमध्ये प्रथम वर्षाकरीता विद्यार्थी प्रवेशित करता येणार नाहीत. पुढील शैक्षणिक वर्षाकरीता अशा नियमित अतिरिक्त तुकडीकरीता शासनाने विहीत केलेल्या निकष व कार्यपध्दतीनुसार नव्याने अर्ज सादर करुन शासन मान्यता घेणे आवश्यक राहील.**

सबब, शासन निर्णय दि.३१/०८/२०१७ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेल्या अतिरिक्त जलद तुकडयांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता नियमितपणे व अंमलबजावणीत असणाऱ्या कार्यपध्दतीनुसार मान्यता घेणे क्रमप्राप्त आहे.

या शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे सर्व अकृषि विद्यापीठांतर्गत ज्या महाविद्यालयांनी त्यांना मंजूर केलेल्या अतिरिक्त जलदगती तुकडयांकरीता शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता संबंधीत विद्यापीठांकडे अर्ज सादर केलेला नाही, अशा अतिरिक्त तुकडयांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता प्रथम वर्षापासून सुरु ठेवता येणार नाहीत.

उक्त बाब विद्यापीठामार्फत संलग्नित अशासकीय महाविद्यालयांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी व शासन निर्देशाप्रमाणे विद्यापीठाने जलदगती अतिरिक्त तुकडयांबाबत विद्यापीठ स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

**(डॉ.विजय नारखेडे)**
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत:-

१) मा.अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

२) मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीसाठी सविनय सादर.